दैनिक लोकक्रांतीचा आरंभ


# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार २२ ऑक्टोबर २०२४ | अंक ३१६ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# लढणार, पाडणार, जिरवणार, जरांगे पाटलांची त्रिसुत्री ठरली; पण टार्गेटवर कोण?

**बीड प्रतिनिधी :- गोकुळ इंगोले**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी रविवारी अंतरवाली सराटीमध्ये बैठक बोलावली होती. या बैठकीमध्ये त्यांनी जिथे निवडून येतील तिथे उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच जिथे निवडून येण्याची शक्यता कमी आहे, तिथे जो उमेदवार मराठा आरक्षणाला पाठिंबा देईल त्याला निवडून आणा असं देखील जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.दरम्यान यावेळी बोलताना जरांगे पाटील यांनी म्हटलं की, चार दिवसांत आम्ही सगळे उमेदवार डिक्लेअर करू कोणत्या मतदारसंघात लढायचं? एससी, एसटीला कुठे पाठिंबा द्यायचा?



हे आम्ही ठरवणार आहोत. जिथे आम्ही निवडणूक लढणार नाहीत तिथे कोणाला पाठिंबा द्यायचा हे आम्ही आगोदर बॉण्ड घेऊन ठरवणार आहोत.आमचं ठरलं आहे, यावेळी आम्ही लढणार आहोत, पाडणार आहोत आणि जिरवणार पण आहोत. राज्यातल्या कोणीच आम्हाला चर्चा केल्याशिवाय बॉण्ड द्यायचा नाही. एससी, एसटी कोणत्याही पक्षाचा असो ज्यांना आमची मागणी मान्य आहे त्यांनी बॉण्ड द्यायचा. जर बॉण्ड आला नाही तर आम्ही अपक्ष उमेदवार उभा करू. जर ओबीसी उमेदवाराला आमच्या मागण्या मान्य असतील आणि त्याने बॉण्ड दिला तर आम्ही त्याला देखील पाठिंबा देऊन निवडून आणू असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.आम्ही काल बोलताना म्हटलो की सगळ्यांनी अर्ज भरून घ्या, पण सगळ्यांनी अर्ज भरू नका, दोन तीन उमेदवार निवडा आणि त्यांनी अर्ज भरा. ज्या दिवशी एकाच नाव डिक्लेअर होईल त्यावेळेस बाकीच्यांनी आपली उमेदवारी मागे घ्यायची आहे. जर उमेदवारी मागे घेतली नाही तर तो पैसे घेऊन आमच्याविरोधात उभा राहिला असं आम्ही समजू असंही यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

## नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे पाटील?

चार-पाच दिवस अंतरवालीकडे कोणत्याच बांधवांनी येऊ नये, यामुळे मतदारसंघात उमेदवार ठरवता येत नाही. माझी हात जोडून कळकळीची विनंती आहे, मला जरा तीस-पस्तीस दिवस मोकळा वेळ द्या, गावात राहा निर्णय काय होतो यावर सावध राहा. खरंच सांगतो मला काम करता येत नाही, आज पूर्ण वेळ दिवस वाया गेला आहे. फक्त फोटो आणि भेटी एवढंच झालं. पुढचं काम झालं नाही तर तुम्ही मला नाव ठेवताल असं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.पुढे बोलताना ते म्हणाले की, आम्ही आजपासून तयारी सुरू केली आहे, कोणत्या मतदारसंघात लढायचं ते. जिथे आम्ही राज्यात लढणार नाहीत, तिथे मिरीटप्रमाणे कोण आहे? अपक्ष ताकदवर कोण आहे हे आम्ही बघणार आहोत. आम्ही वैयक्तिक मतदारसंघात निवडणूक लढवणार आहोत ते फायनल झाल्याशिवाय सांगता येणार नाही. जेव्हा आमचे मतदार संघ आणि उमेदवार फायनल होतील त्या दिवशी ते चित्र स्पष्ट होईल. आम्हाला विचारल्याशिवाय कोणीही लेखी बॉण्ड आणू नका, संयम ठेवा असं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

## मा. आ. भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली आष्टीत बुधवारी मुस्लिम बांधवांचा संवाद मेळावा

**दैनिक लोकआरंभ//**

आष्टी प्रतिनिधी

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आ. भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी आष्टी येथे मतदारसंघातील अल्पसंख्याक (मुस्लिम) समाज बांधवांच्या संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मतदारसंघात अल्पसंख्याक



मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने आहेत. अनेकजण शासनाच्या विविध योजनांपासून वंचित आहेत. त्यांच्या अनेक समस्या आहेत त्या जाणून घेण्यासाठी आणि त्यावर चर्चा करण्यासाठी या संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे तरी आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदारसंघातील अल्पसंख्याक मुस्लिम समाजाचे कार्यकर्ते व समाजबांधवांनी लक्ष्मी लॉन खडकत रोड आष्टी येथे बुधवारी दिनांक २३ आक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन युवा नेते अजयदादा धोंडे मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## ऊस उत्पादकांसाठी खुषखबर; साईप्रसादचे बॉयलर अग्निप्रदिपन:गतवर्षी ऊसाला दिला सर्वाधिक भाव

बीड/प्रतिनिधी: जिल्ह्यातील अतिरिक्त ऊसाचा प्रश्न लक्षात घेवून शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरू केलेल्या साईप्रसाद नॅचरल शुगर कारखान्याचा तिसरा गळीत हंगाम सुरू होत आहे. शुक्रवारी कारखान्याचे अध्यक्ष, संचालक यांच्या हस्ते विधीवत पुजा करून बॉयलर अग्नी प्रदिपन कार्यक्रम संपन्न झाला. साईप्रसाद नॅचरल शुगर प्रा. लि.हिरापूर (ताग़ेवराई) च्या तिसरा गळीत हंगाम २०२४-२५ ला सुरूवात करण्यात येत आहे. शुक्रवार दि.१८ ऑक्टोबर रोजी बळीराम गवते, सचिन दाभाडे, प्रज्ञेश पराड यांच्या हस्ते बॉयलर अग्नी प्रदिपन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी प्रमूख पाहूणे म्हणूण प्रभाकर पराड व संजय देशमूख यांची उपस्थिती होती. साईप्रचादचे चेअरमन बबनराव गवते, व्हाईस चेअरमन महेश दाभाडे यांच्या मार्गदर्शनाखाली २०२४-२०२५ या गळीत



हंगामाला सुरूवात होत आहे. गतवर्षी पंधरा दिवसाला ऊसाचे बील देण्याचे काम या कारखान्याने केले असून सर्वाधिक भाव देण्याचे कामही केले आहे. इतकेच नाही तर परिसरातील कोणत्याही शेतकऱ्यांचा ऊस शेतात राहणार नाही, यासाठी संपुर्ण ऊसाचे क्षेत्र संपेपर्यंत कारखाना सुरू होता. दि.१८ रोजी बॉयलर प्रदिपन कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर आता अवघ्या काहीच दिवसात गळीत हंगामाला सुरूवात होत आहे. यावर्षी जिल्ह्यात चांगला पाऊस झालेला असल्याने ऊसाचे क्षेत्रही वाढलेले आहे. या शेतकऱ्यांना साईप्रसाद शुगर कारखान्याचा मोठा आधार झालेला आहे. कार्यक्रमाला हनुमान मुळीक, राहूल वायकर, जोगदंड यांची उपस्थिती होती.

## बीड विधानसभा मतदारसंघाबरोबर अशा अनेक मतदारसंघांमध्ये धनगर समाज निर्णायक भूमिका बजावणार – अमर वाघमोडे

**दैनिक लोकआरंभ//**

बीड प्रतिनिधी /अंकुश गवळी

आगामी विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजले असून अनेक विधानसभा मतदार संघामध्ये ही निवडणूक रंगतदार होणार असल्याचे स्पष्ट संकेत दिसून येत आहेत. या मतदारसंघांमध्ये अनेक तरुण, तडफदार उमेदवार निवडणूक रिंगणामध्ये



उतरण्याचे स्पष्ट चिन्हे दिसत आहेत.आगामी निवडणुकीमध्ये बीड व अश्या अनेक मतदार संघाचा भावी आमदार निवडून देण्यामध्ये धनगर समाजाची निर्णयाक भूमिका असणार आहे. बीड मतदार संघ हा गेल्या अनेक वर्षापासून प्रस्थापित राजकारण्यांचा मतदारसंघ राहिला असून या मतदारसंघांमध्ये प्रस्थापित घराणे सोडता इतर कदापिही उमेदवार या मतदारसंघाने स्वीकारलेला नाही. परंतु असे असले तरीही आत्ता धनगर समाज, येणाऱ्या बीड विधानसभा मतदारसंघांमध्ये आपली निर्णयक भूमिका बजवणार असल्याचे धनगर समाजाचे बीड जिल्ह्याचे युवा नेते अमर वाघमोडे यांनी माहिती दिली आहे,

## नमिता मुंदडा यांना आम्हीच घरी बसवणार? पंकजाताई मुंडे समर्थकांचा एल्गार,??

(बीड-विवेक कुचेकर) सूत्राच्या माहितीनुसार नुकतीच मराठा योद्धा मनोज दादा जरांगे यांची सकारात्मक भेट माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांनी आंबेजोगाई येथील भाजपाच्या मोठ्या गटासह व भारतीय जनता पार्टीच्या 17 नगरसेवकांसह घेतली असून, जवळजवळ आम्ही आलो नाही तरी चालेल पण नमिता ताई मुंदडा, यांना आम्ही घरी बसवणारच असाच बैठकीत निर्णय झाल्याचे बोलले जात आहे. विधानसभेच्या संग्रामाला सुरुवात झाली असून तिकीट वाटप लवकरच दोन दिवसाच्या आत होणार असून तिकीट वाटप होण्याअगोदरच आंबेजोगाईत मात्र नमिता लोखंडे अर्थात नमिता अक्षय मुंदडा यांना घरी बसवण्यासाठी पंकजाताई मुंडे नाराज समर्थक, विविध संघ, संघटना त्याचबरोबर भारतीय जनता पार्टीचे आजी-माजी जवळजवळ 17 नगरसेवक हे संगीता ताई ठोंबरे यांच्या निर्णायक बैठकीला बसत असून नमिता मुंदडा यांना कसे घरी बसवायचे याचे नियोजन मात्र प्रत्येक बैठकीत आंबेजोगाई ते मुंबई असेच चालू असून याच अनुषंगाने दोन दिवसांपूर्वी संगीता ताई ठोंबरे यांच्या सोबत आंबेजोगाई च्या बड्या बड्या नगरसेवकांनी मराठा योद्धा मनोज दादा जरांगे यांची भेट घेतली असून ही भेट सकारात्मक मानली जात असून संगीता ताई ठोंबरे समर्थक नाराज पंकजाताई मुंडे समर्थक , नाराज मुस्लिम बांधव आणि नाराज मराठा बांधव सर्वजण विद्यमान आमदार नमिता अक्षय मुंदडा यांना 10001% यांना घरी बसवणार असल्याच्या आंबेजोगाई शहरातील या चर्चेला मात्र जागोजागी उधान आले असून, बैठकीतील घेतलेले निर्णय साक्षात खरे ठरतात का नाही हेच पाहणे महत्त्वाचे ठरणार असून, मुंदडा कुटुंबीयांना घरघर लागली हे मात्र नक्की,,,!

# बीड विधानसभा मतदार संघासाठी बाजीराव चव्हाणच ठरणार बाजीगर..!

## बाजीराव चव्हाण यांचा बीड विधानसभेत घुमणार आवाज..

**बीड प्रतिनिधी,**

बीड विधानसभा मतदार संघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या अत्यंत जवळचा कार्यकर्ता बीड विधानसभेच्या रिंगणात. बीड विधानसभा मतदार संघामध्ये येणाऱ्या विधानसभेत युवासेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांना लोकांची पसंती असल्याचे पहायला मिळत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांचे विश्वासू अशी ओळख असलेले बाजीराव चव्हाण यांनी शेकडो रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत मिळवून दिली आहे. तरुणांची एक फळी त्यांच्या मागे आहे. शेकडो रुग्णांना त्यांनी मदत केली आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून अनेक गोरगरिब रुग्णांना त्यांनी मदत केली आहे. बीड जिल्ह्यातील नव्हे तर महाराष्ट्र राज्यामध्ये तरुणांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे नेतृत्व म्हणजे बाजीराव चव्हाण आहेत. हजारो तरुणांना रोजगार मिळवून दिला आहे.बीडच्या गडात शिवसेनेचा बाजीराव चव्हाण डरकाळी फोडणार. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून आरोग्य दूत म्हणून काम पाहणारे बाजीराव चव्हाण बीड विधानसभा निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. जनतेच्या सेवेसाठी बीड विधानसभा विजयी होऊन अधीक काम करण्यासाठी सज्ज झाले आहेत. मागील काही दिवसांपासून बीड मतदारसंघात शेकडो गावात



## युवकांचा बुलंद आवाज बाजीराव चव्हाण..

राजकारणामध्ये सातत्याने तरुणांचा काही राजकीय नेते फक्त त्यांच्या फायद्या पुरता वापर करतात निवडणुकीमध्ये तरुणांना हाताशी धरून निवडणुक लढविने जिंकणे असे कामे करून घेतात त्या नंतर बेरोजगार तरुणांना त्या नंतर वाऱ्यावर सोडून दिले जाते परंतु लोकप्रिय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू बाजीराव चव्हाण मात्र अश्या तरुणांना वाऱ्यावर सोडून देऊ शकत नाहीत असा विश्वास तरुणांना आहे त्यामूळे तरुणांचे उमलते नेतृत्व म्हणुन बाजीराव चव्हाण यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. मागील काही कार्यक्रमाच्या माध्यमातून तरुणांनी दाखवून दिले आहे. त्यामूळे सध्या तरुणांच्या गळ्यातील ताईत बनले आहेत



प्रत्यक्ष भेट देउन सामान्य नागरिकांच्या समस्या जाणून घेत त्यांच्याशी हितगूज साधत आहेत, प्रत्येक गावातून बाजीराव चव्हाण यांना उदंड प्रतिसाद मिळत आहे. आमचा नेता कसा असावा बीड मतदार संघाचा आमदार कसा असावा निस्वार्थी काम करणाऱ्या बाजीराव चव्हाण यांच्या सारखा असावा असे नागरिकांतून बोलले जात आहेत. गावागावातून नागरिकांकडून बाजीराव चव्हाण यांना मोठा विश्वास दिला जात आहे. त्यामूळे बाजीराव चव्हाण यांचा विजय ही काळ्या दगडा वरची पांढरी रेग आहे.

बीड/महाराष्ट्र
सविस्तर घडामोडी
दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २२ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com


# ज्ञानकुंभाने शोधली,वक्तृत्वाची हिरकणी रुपाली चौधरी

आयुष्यात नकळतपणे भरकटणाऱ्या विद्यार्थ्यांनविषयी तळमळ असणारे,अडचणींचा सामना करत प्रगतीचा मार्ग चाचपडणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे,त्यांच्यासाठी काहीतरी करू इच्छिणारे प्रा.डी.टी. पाटील सरांसारखे व्रतस्थ शिक्षक जेव्हा समाजात असतात..तेव्हा एकलव्यासारखी मेहनत करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांमध्ये रुजू लागते.. आणि येथूनच एका यशस्वी विद्यार्थिनीची यशोगाथा सुरू होते..

अशीच एक अंधारातली चांदणी आज प्रकाशमय झालेली आहे.तिने आज उत्तुंग भरारी घेतली आहे.तिच्या प्रगतीचा/यशाचा मार्ग अत्यंत कठीण,अवघड आणि अडखळलेल्या परिस्थितीमधून जातो.घरात वातावरण नसतांना,कोणतीही साथ नसतांना,कोणत्याही पद्धतीचा घराण्याला शैक्षणिक,सामाजिक,राजकीय वारसा नसतांना,अत्यंत गरिबीच्या परिस्थितीमध्ये जन्माला येऊन एक हुशार विद्यार्थिनी तिला कोणाच्या तरी आधाराची गरज होती. पण भगवंताला त्याची जाणीव असते,कोणालाच नाही पण इयत्ता 9 वी त आल्यानंतर तिची जाणीव प्रा.डी.टी.पाटील सराना झाली. आणि तिथून तिला मार्गदर्शनाला सुरुवात झाली.ती मार्गदर्शन घेत घेत 10 वी ला चांगले गुणांनी पास झाली.12 वी ला तालुक्यात पहिली आली.ग्रॅज्युएशन केले. विविध स्पर्धा गाजवल्या.कॉलेज जीवनात असताना,विविध वकृत्व व वादविवाद स्पर्धा राज्यस्तरीय, विभागीय,जिल्हास्तरीय,तालुकास्तरीय स्पर्धामध्ये प्रथम क्रमांक कधी चुकला नाही.आणि जी गरुड भरारी घ्यायला सुरुवात झाली त्यातूनच पुढे साहित्यिकांशी जोडली गेली.आमच्या सारख्या साहित्यिकाशी जोडली गेली. वेगवेगळ्या कविसंमेलनामध्ये जेव्हा तिच्या कविता गाजायला लागल्या. तिने स्वलिखीत असलेल्या तिच्या कविता,लेख ,तिचे संपादकीय कार्य ह्या सगळ्या गोष्टी विचारात घेता.ती एक लहान पण महान साहित्यिक आहे असे आमच्या लक्षात आले.आणि मग रुपालीची यशोगाथा जीवनामध्ये सुरू झाली. रुपालीने आजपर्यंत काय काम केले नाही याचा जर उल्लेख केला तर मला असे समजेल.. मी जेव्हा तिच्याशी बोललो,तिच्या घरी गेलो, शेकडोने असलेले सन्मानचिन्ह सन्मानपत्र मोठ्या संख्येने पुरस्कार पाहिले असता..माझ्या लक्षात आले की,रुपाली खरोखर साहित्य,शैक्षणिक,सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रात नावलौकिक मिळवत आहे.यामध्ये मी जेव्हा तिच्याशी बोललो,प्रत्यक्ष पाहिले.. तेव्हा माझ्या लक्षात आले की,घरात डबे रिकामे असतील पण घरात पुरस्कार ठेवायला जागा नाही. तिची आई सौ. छायाबाई गृहिणी व वडील श्री.कन्हैयालाल चौधरी हे दुसऱ्याच्या गाडीवर ड्रायव्हर म्हणून काम करतात.बाप मेहनती मजूर आहेत परंतु निर्व्यसनी आहेत. खिशाने फाटका पण मनाने श्रीमंत दिसले.अश्या ह्या संस्कारी आईवडिलांच्या पोटी जन्माला आलेली ही कन्यारत्न..वयाच्या 17 व्या वर्षी ग्रामपंचायत पिंपळनेरने तिला 15 ऑगस्ट रोजी ध्वारोहणाचा मान दिला..जी ग्रामपालिका आताची नगरपरिषद आहे.90.4 ह्या पांझरा रेडिओ केंद्रावरून तिच्या अनेक मुलाखती प्रसिद्ध झाल्या."आजची स्त्री व अंधश्रध्दा" ह्या विषयाला तर पुन्हा पुन्हा मागणी होत होती.अश्यापद्धतीचे हे अभ्यासपूर्ण व्याख्यान होते. साक्री व बागलाण तालुक्यात सुप्रसिद्ध असलेल्या एकवीरा न्यूज चॅनलवर तिने निवेदकाची भूमिका पार पाडून,बातम्या देण्याचेही काम तिने केले आहे. त्यानंतर "मन की बात" यातही तिची प्रतिक्रिया दिल्ली याठिकाणी पोहचली.कोरोना काळात कोरोना जनजागृतीपर जे व्याख्यान दिले होते ते गल्लोगल्ली,चौकाचौकात एकवण्यासाठी तहसीलदार साहेबांनी स्वतंत्र गाडी करून व्यवस्था केली होती. तेच व्याख्यान तिच्या महाविद्यालयातील NSS च्या शिक्षकांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात पाठवले व त्यांनी भारत सरकारच्या युवा व क्रीडा कल्याण मंत्रालय यांच्याकडे पाठवले व त्यांनी याची दखल घेतली गेली.विविध पथनाट्य"मतदार जनजागृतीपर","तंबाखू मुक्त पथनाट्य",व अश्या एक ना अनेक सामाजिक विषयांवरच्या पथनाट्यात मुख्य निवेदिका म्हणून काम केले व जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने अनेक ठिकाणी पथनाट्य सादरीकरण केले.यानंतर तिला अनेक पुरस्कार मिळत गेले.यात

?राज्यस्तरीय ज्ञानसिंधू युवाभूषण पुरस्कार,२०२४
?जिल्हास्तरीय सुषमा स्वराज वकृत्व पुरस्कार,२०२३
?वक्तृत्वाची हिरकणी(ग्राम पंचायत,पिंपळनेर),२०२३
?समाजभूषण पुरस्कार,२०२३
?भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर युवती प्रेरणा पुरस्कार,२०२४
?महाराष्ट्र शासन,उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,सन्मानपत्र
?८ मार्च,जागतिक महिला दिन सन्मानपत्र२०२०-२१
?राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेची गोल्ड मेडल विजेती,२०२०
?आशा फाउंडेशन Inter national Development of Excellent Education Academy,सन्मानपत्र,२०१६
?वक्तृत्वाची उगवती चांदणी,सन्मानपत्र२०२० (पिंपळनेर तालुका मन्सूरी पिंजारी विकास संस्थातर्फे)
?राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,ओ.बी.सी.सेल धुळे जिल्हा"कोरोना योद्धा सन्मानपत्र"

अशा रीतीने तिची यशोभरारी सुरू झाली.जेव्हा तिला विचारण्यात आले..एवढ्या कमी वयात तुझी प्रगती कशी झाली. त्यावेळेला तिने दोन शब्दात त्याचे उत्तर असे दिले. की,हे सर्व माझ्या गुरूंची गुरुदक्षिणा आहे.ज्यांनी मला आयुष्याची वाट अन् जीवनाची पहाट दाखवली ते माझे वडील ज्यांची मी मानसकन्या आहे ते माझे गुरुवर्य,प्रा.डी.टी. पाटील व माझी प्रेमळ आई सौ.सिमा पाटील यांच्याविषयी ती नेहमीच कृतज्ञता व्यक्त करतांना दिसते

# श्री क्षेत्र चाकरवाडी येथील अंगणवाडीमध्ये पालक मेळावा संपन्न..

बीड प्रतिनिधी - बीड तालुक्यातील श्री क्षेत्र चाकरवाडी येथील अंगणवाडीमध्ये पालक मेळाव्यात मुलांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी अंगणवाडी सेविकांनी वेगवेगळे प्रोजेक्ट विषय पालकांना योग्य ते मार्गदर्शन केले. या प्रोजेक्टमध्ये गरोदर मातांची काळजी कशी घ्यावी, आपल्या लहान मुलांची काळजी कशी घ्यावी, त्याचे संगोपन कसे करावे, आपण दररोजच्या आहारामध्ये काय खाल्ले पाहिजे, आपण कशा पद्धतीने राहिले पाहिजे, आपले जीवन कसे जगता येते अशा प्रकारच्या अनेक प्रोजेक्ट द्वारे अंगणवाडी सेविकांनी पालक मेळाव्यामध्ये कलाकृती सादर करत दाखवून दिले. तसेच पालकांना समजावून सांगितले. पालकांना संवाद कृती प्रेम याची गरज असते असे सुद्धा यावेळी अंगणवाडी सेविकांनी बोलताना



म्हटले. पोषण महाअंतर्गत हा पालक मिळावा भव्य दिव्य प्रमाणात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून केकान साहेब जिल्हा परिषद बीड, महादेव महाराज चाकरवाडीकर, श्रीमती पिसे मॅडम पर्यवेक्षिका आणि त्यांची टीम, खोड मॅडम, बडे मॅडम, नागेश मॅडम, टेहरे मॅडम, आदी अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या. यावेळी कार्यक्रमा साठी मार्गदर्शन करताना संस्थांचे महादेव महाराज चाकरवाडी यांनी विद्यार्थी आणि पालक यांना मार्गदर्शन केले. यावेळी या कार्यक्रमांमध्ये अध्यक्ष यांनी भाषण करत असताना बालविवाह प्रतिबंधक कायद्या विविध योजनेची माहिती दिली. तरी गावामध्ये कुठे बालविवाह होत असेल तर प्रशासनास कळवा आणि बालविवाह रोखा असे यावेळी बोलताना अध्यक्षांनी म्हटले. यावेळी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पिसे मॅडम यांनी केले होते आणि या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चाकरवाडी या शाळेचे मुख्याध्यापक कांबळे सर यांनी केले होते. तरी या कार्यक्रमासाठी चाकरवाडी गावचे पोलीस पाटील नानासाहेब काकडे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या ससाने मॅडम, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी पालक अंगणवाडी सेविका आणि मदतनीस उपस्थित होते. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम अंगणवाडी सेविका मदतीने चाकरवाडी आणि येळंब घाट विभाग यांनी घेतले.

# राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांची गेवराई विधानसभेच्या मतदारसंघात जोरदार चर्चा.

## अठरापगड जातीला सोबत घेऊन चालणारे व्यक्तिमत्व

बीड प्रतिनिधी ,अंकुश गवळी महाराष्ट्र राज्य मध्ये सध्या विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे, त्या पार्श्वभूमी वर महायुती मधून राष्ट्रीय समाज पक्ष हा बाजूला पडला आहे, राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर यांनी राष्ट्रीय समाज पक्ष राज्यातील 288 जागा विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवणार असल्याचा दावा केला आहे, यामध्ये बीड जिल्ह्याचे राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा गेवराई विधानसभा मतदारसंघाचे निरीक्षक अण्णासाहेब मतकर यांनी गेवराई विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे



त्यांनी जाहीर केल आहे, यामध्ये त्यांनी मतदारसंघात भेटीगाठी घ्यायला सुरुवात केली आहे, सर्व जाती-धर्माला सोबत घेऊन जाणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांची गेवराई मतदार संघात लोकप्रियता आहे, आतापर्यंत सामाजिक कार्याच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात त्यांनी आपली एक आगळी वेगळी ओळख निर्माण केली आहे, यामध्ये गेवराई विधानसभा मतदारसंघात प्रा अण्णासाहेब मतकर यांची जोरदार चर्चा होत आहे, यामध्ये गेवराई विधानसभा निवडणूक लढणार आणि जिंकणार असल्याचा सुद्धा त्यांनी जाहीर केला आहे, त्यामुळे राष्ट्रीय समाज पक्षाची पण जिल्ह्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात एक ताकद आहे, येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत राष्ट्रीय समाज पक्षाच्या जागा जिंकण्याची शक्यता आहे

# मतदार जनजागृतीवर अधिक भर द्या -महेंद्रकुमार कांबळे

## माध्यम कक्ष, स्वीप आणि टपाली मतपत्रिका प्रक्रियेबाबत प्रशिक्षण

बीड, दि.२१ :- विधानसभेची निवडणूक 20 नोव्हेंबरला होत आहे. या निवडणुकीत मतदान अधिकाधिक व्हावे, यासाठी अधिकाधिक जनजागृतीवर भर द्यावा, अशा सूचना उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी केले. जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघातील माध्यम कक्ष, स्वीप आणि टपाली मतपत्रिका प्रक्रियेबाबतचे प्रशिक्षण आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पार पडले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, प्रशिक्षक उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, पोलिस निरीक्षक संतोष साबळे, एनआयसीचे संशोधक भाऊसाहेब बांगर, प्रा. लोळगे यांच्या



उपस्थितीत प्रशिक्षण पार पडले.

जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदार संघातील माध्यम कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. या कक्षाच्या माध्यमातून तसेच माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीकडून करावयाच्या कार्यवाहीबाबत श्री. कांबळे यांनी मार्गदर्शन केले. समितीचे कार्य, कार्यपद्धती, पेड न्यूज, फेक न्यूज याबाबतही उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले. माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीकडून राजकीय जाहिरातीचे पूर्व प्रमाणिकरण जिल्हास्तरावरून करण्यात येणार आहे. यासह समितीची रचना, कार्य, पेड न्यूजविषयक तक्रारींची पडताळणी, माध्यम सनियंत्रण यावर प्र.जिल्हा माहिती अधिकारी डॉ.श्याम टरके यांनी सादरीकरण केले. या प्रशिक्षणानंतर जिल्हाभरात स्वीपमार्फत राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांचाही आढावा याठिकाणी घेण्यात आला. मतदारांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढवावा यासाठी स्वीप कक्षाने अधिकाधिक भर द्यावा, अशा सूचना श्री. कांबळे यांनी अधिकाऱ्यांना केल्या. या दोन्ही प्रशिक्षणानंतर टपाली मतदान प्रक्रियेबाबत जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

# बागझरी येथील दत्त मंदिराचे दर्शन घेऊन धनंजय मुंडे यांनी केला प्रचाराचा शुभारंभ

## ज्याला तुम्ही निर्माण केले त्याला कोणी संपवण्याचे आव्हान देत असेल तर त्याला 20 नोव्हेंबर रोजी मतातून दाखवून द्या - मुंडेंचे आवाहन



परळी वैद्यनाथ (दि. 18) - पट्टीवडगाव जिल्हा परिषद गटातील बागझरी येथील दत्त मंदिरात दर्शन घेऊन आरती करत आज धनंजय मुंडे यांनी परळी विधानसभा मतदारसंघात प्रचाराचा शुभारंभ केला आहे. धनंजय मुंडे यांनी सर्वात पहिल्यांदा लढवलेल्या 2002 च्या जिल्हा परिषद निवडणुकीत सुद्धा प्रचाराचा शुभारंभ त्यांनी बागझरीच्या याच दत्त मंदिरात दर्शन घेऊन केला होता. धनंजय मुंडेंच्या प्रत्येक निवडणुकीची सुरुवात बागझरी येथील दत्त मंदिराच्या दर्शनाने होत असते. मुंडे कुटुंबाच्या दोन पिढ्या तुमच्या सर्वांची सेवा करण्यात गेल्या. आजही आम्हाला सेवेची संधी मिळते ती तुमच्याच आशीर्वादाने, आपण मतदारसंघात विकासासाठी दिलेला प्रत्यक्ष शब्द पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. प्रचंड प्रमाणात विकास निधी खेचून आणला. मात्र देशाचे काही उच्चपदस्थ नेते माझा पराभव करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. परंतु तुम्हीच मला तुमच्या आशीर्वादाने आज पर्यंत इथवर आणले आहे. त्याला तुम्हीच निर्माण केले आज त्यालाच संपवण्याची भाषा केली जात असेल किंबहुना तसे आव्हान दिले जात असेल तर अशा लोकांना 20 नोव्हेंबर रोजी मतदानातून तुम्ही दाखवून द्या असे आवाहन यावेळी बागझरी व परिसरातील नागरिकांशी संवाद साधताना धनंजय मुंडे यांनी केले. मी कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही ज्या दिवशी जात बघून किंवा जात दाखवून मतदान मागायची माझ्यावर पाळी येईल त्या दिवशी मी राजकारण सोडून देईल. कोरोना काळात केलेली मदत आठवा त्यावेळी सुद्धा आपण सर्वांना सोबत घेऊन आपल्याकडून जी शक्य ती सर्व मदत केली. तेव्हा आता तुम्ही स्वतः उमेदवार आहेत असे समजून तुम्ही कामाला लागा असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २२ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com



# जागा वाटपावरुन वाद, पवारांची मध्यस्थी; महाविकास आघाडीत काय सुरुये?

काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेत जागा वाटपावरुन वाद सुरु असताना उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस तसंच संजय राऊत यांनी अमित शाहांची भेट घेतल्याची बातमी एका माध्यमानं दाखवली आणि संजय राऊत प्रचंड भडकले. भाजपसोबतच्या भेटीची बातमी चुकीची असून आमच्यावर शंका घेणारे एका बापाचे नाहीत, असा हल्लाबोल राऊतांनी केलाय. भाजपसोबत हातमिळवणीचा संबंधच नाही. भाजप सोबत जाणं म्हणजे औरंगजेबशी हातमिळवणी करण्यासारखं आहे, असा हल्लाबोल राऊतांनी केलाय.

शरद पवार यांची मध्यस्थी

इकडे काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेचा वाद मिटवण्यासाठी शरद पवारांनी मध्यस्थी केल्याची माहिती आहे. आधी आदित्य ठाकरे आणि अनिल परबांनी काँग्रेसच्या भूमिकेची माहिती पवारांना दिली. त्यानंतर शरद पवारांनी काँग्रेसच्या हायकमांडशी संपर्क साधला. रात्री उशिरापर्यंत जयंत पाटील मातोश्रीवर होते, पवार-काँग्रेस हायकमांडमध्ये झालेल्या चर्चेची माहिती जयंत पाटलांनी ठाकरेंना दिली. आता तिढा असलेल्या जागांवर महाविकास आघाडीची उद्या पुन्हा बैठक आहे.

तर दिल्लीत राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खर्गेंच्या उपस्थितीत काँग्रेसच्या निवडणूक समितीची बैठक झाली. ज्यात उमेदवारांच्या नावांवर अंतिम शिक्कामोर्तब झालंय. या बैठकीआधी विदर्भातील 12 जागा ठाकरेंच्या शिवसेनेला सोडू नका, अशी भूमिका महाराष्ट्रातील नेत्यांनी काँग्रेस हायकमांडसमोर घेतल्याची माहिती आहे.

विदर्भातील जागांवरुन वाद

काहीही करा विदर्भातील 12 जागा ठाकरे गटाला सोडू नका, अशी भूमिका महाराष्ट्रातील नेत्यांनी घेतल्याची माहिती आहे. दिल्लीतील काँग्रेसच्या बैठकीत राज्यातील नेत्यांची आक्रमक भूमिका घेतल्याचं कळतंय. ठाकरेंच्या शिवसेनेची ताठर भूमिका असून तुम्ही झुकतं माप देऊ नका असं महाराष्ट्रातील नेत्यांनी सांगितल्याचं समजतंय. ठाकरेंची शिवसेना शरद पवारांकडे असलेल्या जागा का मागत नाहीत?, असा सवालही महाराष्ट्रातल्या नेत्यांचा आहे. जागावाटपात ठाकरेंच्या शिवसेनेकडून सहकार्य नसल्याचाही काँग्रेस नेत्यांचा सूर आहे. विदर्भात विशेषत: नागपूर, अमरावतीमध्ये उद्धव



ठाकरेंच्या शिवसेनेला काही जागा वाढवून हव्या आहेत. मात्र काँग्रेस त्यासाठी तयार नसल्यानं दोघांमध्ये वादाची ठिणगी पडली. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, काँग्रेस 105-110 जागा, ठाकरेंची शिवसेना 95-100 जागा आणि शरद पवारांची राष्ट्रवादी 80-85 जागा लढू शकते. पण सध्या तरी भाजपनं 99 जागांची यादी जाहीर करुन बाजी मारलीये.


## मनोज दादा यांनी ॲड स्वप्निल भैया गलधर यांना बीडचे उमेदवार घोषीत करावे – मोहम्मद अझरुद्दीन



बीड (प्रतिनिधी) : सद्ध्या महाराष्ट्रा मध्ये विधान सभेच्या निवडणुका घोषीत झाल्या आहेत. त्या मध्ये मराठा क्रांती सूर्य मनोज दादा जरांगे यांच्या भूमिकेकडे सर्व मराठा समाज व मुस्लिम समाजाचे लक्ष लागून आहे. त्या मध्ये बीड विधान सभा मतदार संघात युवा नेतृत्व असलेले व सामाजिक कामात सर्व अठरा पगड जाती साठी सदैव तत्पर असलेले ॲड. स्वप्रिल भैय्या गलधर यांना उमेदवारी घोषीत करावी अशी मागणी बीडचे सामाजिक कार्यकर्ते तथा स्व. अमोल गलधर युवा मंचचे मोहम्मद अझरुद्दीन उर्फ ए. एस. गोलू यांनी केली आहे.

या बाबत सविस्तर असे की, ॲड. स्वप्रिल गलधर हे सतत रुग्ण सेवा असेल, कारोना महामारी असेल अशा अनेक कठीण प्रसंगी सर्व समाजातील लोकांच्या मागे एक भाऊ खंबीर पणे उभा राहत आहेत. स्व. अमोल भैय्या गलधर यांचा लोकसेवेचा वारसा अगदी तत्परतेने चालवत आहेत. मराठा आरक्षणाच्या आंदोलनात , मोर्चात सतत अग्रेसर असणाऱ्या व युकांची फौज संगती असणाऱ्या तडफदार युवा स्वप्रिल भैय्या गलधर यांना मनोज दादा जरांगे यांनी उमेदवारी दिली तर बीड विधानसभा क्षेत्रातून एक मराठा क्रांती मोर्चातील नेतृत्व विधान सभेत खूप साऱ्या मताधिक्याने जाईल असा विश्वास सामाजिक कार्यकर्ते मोहम्मद अझरुद्दीन ए एस गोलू. यांनी व्यक्त केला आहे. ......

## हिंगोली विधानसभेसाठी तानाजी मुटकुळे यांना उमेदवारी जाहीर



हिंगोली :- (प्रतिनिधी) विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या वतीने निवडणुकीतील उमेदवारांची पहिली यादी 20 ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात आली असून यात भाजपच्या वतीने हिंगोली विधानसभेसाठी तानाजी मुटकुळे यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. हिंगोली विधानसभेचे विद्यमान आमदार तानाजी मुटकुळे यांच्यासह या विधानसभेकरिता रामदास पाटील यांच्यासह अन्य काही जणांची नावे चर्चेत असताना निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष काय निर्णय घेणार ? याकडे अनेकांचे लक्ष लागले होते. दरम्यान दि. 20 ऑक्टोंबर रोजी दुपारी साडेतीन वाजता भारतीय जनता पार्टीच्या वतीने राज्यातील विधानसभेतील उमेदवारांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये हिंगोली विधानसभेचे उमेदवार तानाजी मुटकुळेच राहतील असे स्पष्ट झाले आहे. मुटकुळे यांची उमेदवारी जाहीर झाली असली तरी रामदास पाटील सुमठानकर काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## दिवा-आगासन येथील निकृष्ट अन्न पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारावर गुन्हा दाखल.

संतोष पडवळ - प्रतिनिधिठाणे, दिवा ता २१ ऑक्टो : दिवा आगासन येथील ठाणे महापालिकेच्या शाळा क्रमांक ८८ मध्ये पोषण आहारातून ४० विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याची घटना गुरुवारी घडली होती. यात ४० विद्यार्थ्यांना ठाणे महापालिकेच्या कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. यातील ३९ विद्यार्थ्यांना शनिवारी सायंकाळपर्यंत उपचारानंतर घरी सोडण्यात आले. तर एका विद्यार्थ्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत अशी माहिती ठाणे महापालिकेच्या वतीने देण्यात आली. पोषण आहार पुरवठा करणाऱ्या आदर्श महिला मंडळाच्या चालक सौ. संज्योत संजय दाते व त्यांच्या सहकाऱ्याविरोधात ठाणे महापालिकेच्या माध्यमातून मुंब्रा पोलिस ठाण्यात गुन्हा क्र. 2043/2024 भारतीय न्याय संहिता 125, 271 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिवा येथील महापालिका शाळा क्रमांक ८८ मध्ये गुरुवारी दुपारी विद्यार्थ्यांना पोषण आहार म्हणून खिचडी देण्यात आली. ही खिचडी खाल्ल्यानंतर ४० विद्यार्थ्यांना उलटी आणि पोटदुखीचा त्रास जाणवू लागला. या सर्व विद्यार्थ्यांना त्वरित महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. यातील ३९ विद्यार्थ्यांना शनिवारी सायंकाळपर्यंत उपचारानंतर घरी सोडण्यात आले. तर एका विद्यार्थ्यांला ताप येत असल्याने त्याच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली होती. दिवा येथील विषबाधा प्रकरणी शाळेत पोषण आहाराचा पुरवठा करणाऱ्या आदर्श महिला मंडळाच्या चालकानी अन्न शिजवताना हयगय केल्याबद्दल मुंब्रा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार दाखल करण्यात आला

## लाचखोर लिपिक लाथ लुचपतच्या जाळ्यात

हिंगोली :- ( प्रतिनीधी ) जिल्ह्यातील एका टायपिंग इन्स्टीट्यूटला संगणक मान्यता देण्यासाठी तसेच तपासणीसाठी प्रस्ताव दाखल करण्यासाठी दहा हजाराची लाच घेताना शिक्षण विभागातील (माध्यमिक) प्रतिनियुक्तीवरील लिपीक गजानन पळसकर यास दि.२१ ऑक्टोंबर सोमवारी दुपारी कार्यालयाच्या परिसरात लाचलुत्पतच्या पथकाने रंगेहात पकडले आहे. याप्रकरणी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.जिल्ह्यातील टायपिंग इन्स्टीट्यूटला संगणक मान्यता देण्यासाठी नुतनीकरणासाठी शिक्षण विभागाकडे (माध्यमिक) प्रस्ताव सादर करावा लागतो. त्यानंतर सदर प्रस्ताव अधिकाऱ्यांकडे पाठवून त्यानंतर अधिकारी प्रत्यक्ष इन्स्टीट्यूटच्या कार्यालयास भेट देऊन पाहणी करतात. त्यानुसार प्रस्ताव मान्यतेसाठी वरिष्ठ कार्यालयात पाठविला जातो. दरम्यान, या संदर्भात एका इन्स्टीट्यूट चालकाने शिक्षण विभागाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव दाखल केला होता. सदर प्रस्तावाबाबत कुठल्याच प्रकाराची कार्यवाही झाली नसल्याने संबंधिताने शिक्षण विभागात प्रतिनियुक्तीवर असलेल्या गजानन पळसकर यांच्याशी संपर्क साधला. त्याने दहा हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली.त्यानंतर संबंधित तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार दाखल केली. त्यानुसार आज लाचलुचपतचे उपाधिक्षक विकास घनवट, पोलिस निरीक्षक प्रफुल्ल अंकुशकर, विनायक जाधव, जमादार तान्हाजी मुंडे, ज्ञानेश्वर पंचलिंगे, राजाराम फुफाटे, रवींद्र वर्णे, गजानन पवार, भगवान मंडलिक, गोविंद शिंदे यांच्या पथकाने दि. 21 सप्टेंबर रोजी दुपारी साडे बारा वाजण्याच्या सुमारास शिक्षण विभागाच्या परिसरात सापळा रचला होता. दरम्यान, तक्रारदाराकडून दहा हजाराची लाच घेतांना पळसकर यास रंगेहात पकडण्यात आले. या प्रकरणी हिंगोली शहर पोलिस स्टेशनमध्ये वृत्त लिहीपर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

# उरण विधानसभा मतदारसंघात आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता

उरण दि २१(विठ्ठल ममताबादे ) विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या आता प्रचाराला तिकिटासाठी धावपळ करायला वेग येणार उरण विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जागा वाटपाचा मुद्दा चर्चेत आलय महाविकास आघाडी आणि महायुतीत जागा वाटपाबाबत काय चाललंय कोणत्या जागांवर रस्सीखेच सुरू आहे याबाबत उरण विधानसभा मतदार संघात जोरदार चर्चा सुरु झालेली आहे या चालू असलेल्या चर्चे मध्ये पूर्ण विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीची बिघाडी होण्याची चिन्हे दिसत आहेत. जो तो आमच्याच पक्षाचा उमेदवार उमेदवारी करणार असल्याची शंभर टक्के खात्री देत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांची उमेदवारी लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांनी जाहिराच केली असून त्यांनी गाव,बूथनिहाय बैठाका सुरुही केल्या आहेत.त्यातच महाविकास आघाडीचे शेतकरी कामगार पक्षातून प्रीतम म्हात्रे यांनी तर पायाला भिंगरी लावून नवरात्री उत्सवात उरण विधानसभा पिंजून काढला. मोठमोठे बॅनर तर जयंत पाटील शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस ज्येष्ठ नेते यांनी तर प्रीतम म्हात्रे उमेदवार असतील असे



सांगून टाकले असताना नुकताच विधानसभा निवडणुकी बाबत शरदचंद्र पवार यांची भेट घेऊन चर्चा केली सोबत मा. आमदार बाळाराम पाटील सोबत होते. महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटातून संतोष घरत हे इच्छुक असल्याचे पत्र पक्षातील वरिष्ठांकडे दिले आहे.संतोष घरत हे कामगार नेते असून त्यांचाही जनतेशी दांडगा जनसंपर्क आहे. अनेकांना त्यांनी न्याय मिळवून दिला आहे. बहुजन चळवळीत ते सक्रिय आहेत त्यामुळे त्यांचेही पारडे जड दिसते.तर महाविकास आघाडीचे काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत उभे राहणार असल्याची नागरिकांमध्ये चर्चा सुरु आहे, त्यांच्याशी संपर्क केला असता मी निवडणूक लढणार नसल्याचे बोलले जाते मात्र त्यांच्या नक्की मनात काय हा प्रश्न मात्र गुलदस्त्यात आहे.

अशी उरण विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीची उमेदवारीची रस्सीखेच सुरु आहे. तसेच महायुतीमध्ये निवडणुकीसाठी उरण विधानसभेसाठी अपक्ष आमदार महेश बालदी यावेळी भाजप पक्षातून महायुतीचे शिवसेना शिंदे गड राष्ट्रवादी अजित पवार गड आरपीआय आठवले गट व भाजप यांचा एकमेव उमेदवार असल्याचे दिसत आहे. तर एकला चलो रे म्हणत मनसे विधानसभेत उडी मारणार असून याचा फटका बसणार का ? बसला तर कोणाला बसेल हे मात्र पहावं लागेल.या पूर्ण विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारीच्या जागा वाटपात कोण बाजी मारेल हे येणाऱ्या काळात समजेल हे सर्व पाहताना आघाडीत बिघाडी होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
मंगळवार २२ ऑक्टोबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# सलमान खानला मारण्यासाठी शूटरची सुरक्षारक्षकाशी मैत्री: हत्येचा प्लॅन बिश्नोई गँगच्या शूटरनेच सांगितले

**मुंबई पोलिसांच्या चौकशीत सुक्खाने सांगितले की, सलमान खानच्या घरी एप्रिल महिन्यात ज्या लोकांनी गोळीबार केला होता, त्यांना सुक्खाने बंदूक दिली होती. या प्रकरणानंतर अजूनही सलमान खानला धमक्या मिळत आहेत.**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येनंतर लॉरेन्स बिश्नोई गँगच्या संबंधित लोकांची धरपकड सुरु आहे. देशभरात लॉरेन्स बिश्नोई गँगचे असलेले नेटवर्क उद्धवस्त करण्याचा प्रयत्न पोलिसांकडून होत आहे. पोलिसांनी बिश्नाई गँगचा शूटर सुक्खा याला अटक केली आहे. या अटकेनंतर सुक्खा याने धक्कादायक माहिती दिली आहे. बॉलीवूड अभिनेता सलमान खान याच्या हत्येचा कट बिश्नोई गँगने आखला होता. त्यासाठी शूटरने सलमान खानच्या सुरक्षा रक्षकाशी मैत्री केल्याचे मुंबई पोलिसांना सांगितले. परंतु त्यांचा हा प्लॅन फेल झाला.

हरियाणामधील पानीपत येथून मुंबई पोलिसांनी सुक्खा याला अटक केली. सुक्खाने 2022 मध्ये मुंबईतील सलमान खानच्या पनवेल येथील फॉर्म हाउसमध्ये रेकी केली होती. तोच सलमान खान याच्यावर हल्ला करणार होता. परंतु त्याचा प्लॅन फेल झाला. रेकी करण्यासाठी सुक्खाने सलमान खानच्या सुरक्षारक्षकाशी मैत्री केली होती.

### तो प्लॅन झाला फेल

मुंबई पोलिसांनी जून 2024 मध्ये सलमान खान याच्यावर नवी मुंबईतील पनवेल येथील फॉर्म हाऊसच्या मार्गावर हल्ला होणार असल्याचा दावा केला होता. परंतु शूटरचा तो प्लॅन फेल झाला. यापूर्वी एप्रिल महिन्यात सलमान खानच्या वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटबाहेर काही अज्ञात लोकांनी गोळीबार केला होता. त्यानंतर सलमान खान याच्या सुरक्षेवर प्रश्न उपस्थित केला जात आहे. या गोळीबार प्रकरणात लॉरेन्स बिश्नोई गँगचा सहभाग होता. असे केले सुक्खा याला

### अटक



सुक्खा याला अटक हरियाणातील पानीपतमधून करण्यात आली. त्याच्या अटकेसाठी मुंबई पोलिसांना टीप मिळाली होती. त्यानंतर स्थानिक पोलिसांच्या मदतीने पानीपतमधील एका हॉटेलमध्ये त्याला अटक करण्यात आली. मुंबई पोलिसांनी त्याला अटक केले त्यावेळी त्याने मद्यपान केले होते. तो आपला नाव सुद्धा सांगू शकत नव्हता. तसेच ओळख लपवण्यासाठी दाढी वाढवली होती. परंतु पोलीस रेकॉर्डमध्ये असलेल्या फोटोमुळे त्याला अटक करता आली.

### सुक्खानेच दिली होती बंदूक

चौकशीत सुक्खाने सांगितले की, सलमान खानच्या घरी एप्रिल महिन्यात ज्या लोकांनी गोळीबार केला होता, त्यांना सुक्खाने बंदूक दिली होती. या प्रकरणानंतर अजूनही सलमान खानला धमक्या मिळत आहेत.

# संतोष रासवे यांनी माजलगाव विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढवावी माजलगाव तालुक्यातील ओबीसी समजाची मागणी

माजलगव (प्रतिनिधी): आगामी विधानसभा निवडणुकीत अनेकांनी गुडघ्याला बाशिंग बांधले असले तरी माजलगाव विधानसभा मतदार संघात मात्र परिस्थितीत काही वेगळीच दिसून येत आहे. या विधानसभा मतदार संघात अनेकजण आपले नशिब आजमावण्यासाठी तारेवरची कसरत करत असून या ठिकाणी ओबीसी उमेदवार निवडून येवू शकतो असा अंदाज ग्रामीण भागातील नागरीक मंदिराच्या पारावर बसून चर्चा करतांना दिसून येत आहे. यात प्रामुख्याने ओबीसी चळवळीतील कार्यकर्ते संतोष रासवे यांचे नाव चर्चेत असल्याचे दिसून येत आहे. पूर्वी पासूनच माजलगाव मतदार संघ हा जिल्ह्यात चर्चेचा विषय राहिलेला आहे. त्यात होवू घातलेल्या निवडणूकीत अनेकांनी आपला शड्डू ठोकला आहे. यामुळे माजलगाव तालुक्यात उमेदवारांची भऊ गर्दी झाली असून अनेक जण नशीब अजमावण्यायासाठी पुढे येत आहेत. जे कधीही सर्वसामान्यांसाठी नाही, जनतेसाठी रस्त्यावर उतरले नाही किंवा कामी आले नाही, असे लोकही म्हणतात मला आमदार करा. अनेक उमेदवाराच्या भऊ गर्दीत माजलगाव तालुक्यातुन ओबीसीचा आमदार होऊ शकतो असा कयास मतदारात व्यक्त केला जात आहे. यामुळे ओबीसी चळवळीतील युवा कार्यकर्ते संतोष रासवे यांनी पूर्ण ताकतीनिशी माजलगाव विधानसभा लढवावी अशी चर्चा गावागावातील ओबीसी मतदारातून व्यक्त केली जात आहे. माजलगाव मतदार संघातून आमदार प्रकाश सोळंके यांचे पुतणे जयसिंग सोळंके हे अजित पवार गटातून लढणार आहेत, तर मोहनराव जगताप यांनी देखील कोणत्याही परिस्थितीत आपण निवडणूक लढवणार असल्याचे जाहीर केले आहे. तर रमेशराव आडसकर हे देखील कोणती भूमिका घेवून निवडणूक रिंगणात उतरणार याकडेही तालुक्याचे लक्ष लागून आहे. आ.पंकजाताई मुंडे आणि ना.धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असलेले माधव निर्मळ, बाबरी मुंडे हे देखील माजलगाव विधानसभा निवडणूकीच्या आखाड्यात उतरु इच्छित आहेत. परंतू निर्मळ की बाबरी मुंडे या दोन्ही नावातून कोणाला तिकीट मिळू शकते हे देखील आत्ताच सांगता येणार नाही. परंतु संतोष रासवे यांनी लोकसभेच्या निवडणूकीत ओबीसी चळवीत जी छाप पाडली त्याचीही चर्चा गावागावात होतांना दिसून येत आहे, आणि पारा-पारावर ओबीसी चळवळीतील या नेतृत्वाचीही चर्चा रंगतांना दिसून येत आहे. दरम्यान पक्षश्रेष्ठी माजलगाव विधानसभा उमेदवारा बाबत काय निर्णय घेतात याकडेही सर्वसामान्य मतदारांचे लक्ष लागले आहे. या मतदार संघात आपणच बाजी मारणार आणि गुलाल आपणच उधळणार असे अनेकांना वाटत असले तरी जनतेचा कौल मात्र ओबीसी चळवळीतील युवा नेतृत्व संतोष रासवे यांच्या नावाची चर्चा गावागवात जोर धरत आहे.



बीड जिल्हा माहेश्वरी महिला संघटन आणि अंबाजोगाई तालुका माहेश्वरी युवा संघटन यांच्या वतीने अंबाजोगाई येथे ‘भव्य दिवाली मेला’ आयोजित करण्यात आला आहे. या ठिकाणी भेट देऊन महिलांनी तयार केलेल्या वेगवेगळ्या साहित्य स्टॉल्सला केज मतदार संघाच्या आमदार नमिता ताई अक्षय मुंदडा यांनी भेटी दिल्या. महिलांच्या कलागुणांना हक्काचं व्यासपीठ आणि अंबाजोगाई शहरातील नागरिकांना उत्तम दर्जाचे दिवाळी साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल आयोजकांचे आभार त्यांनी मानले.

# मराठी पत्रकार परिषद शाखा अंबाजोगाईच्या वतीने 27 ऑक्टोबर रोजी आरोग्य तपासणी शिबीर 22 ऑक्टोबर रोजी रक्ताचे नमुने देण्याचे आवाहन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी मराठी पत्रकार परिषद, अंबाजोगाई व आय एम ए सांस्कृतीक समिती महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व पत्रकार बांधव व त्यांच्या कुटुंबिया साठी 27 ऑक्टोबर रोजी आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले असून मंगळवार दि 22 ऑक्टोबर रोजी रक्ताचे नमुने देण्याचे आवाहन वैद्यकीय कक्ष प्रमुख डॉ राजेश इंगोले यांनी केले आहे.

दैनंदिन धावपळीच्या जीवनात सर्व पत्रकार बांधव आपल्या आरोग्या कडे दुर्लक्ष करतात व या मधूनच नकळत आपल्या शरीरात एखादा गंभीर आजार आपल्याला जडतो व ज्यावेळी



आपल्याला हे कळत त्यावेळी वेळ हाता मधून गेलेली असते. त्या मुळेच वर्षातून किमान 1 वेळ तरी आपल्या शरीरातील बदलाची माहिती व्हावी, त्यावर वेळेत उपचार व्हावेत म्हणून प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी मा एस एम देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी पत्रकार परिषद शाखाअंबाजोगाई व आय एम एसांस्कृतीक समिती महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व पत्रकार बांधव व त्यांच्या कुटुंबिया साठी आरोग्य तपासणी शिबिर घेत असून अत्यावश्यक असलेल्या सर्व रक्ताच्या तपासण्या ज्याची की बाजारात मुळ तपासणी किंमत 3000 आहे परंतु आपल्याला सवलतीच्या दरात ह्या तपासण्या फक्त 800 रुपये मध्ये करून देण्यासाठी पुढाकार घेतलेला आहे. ज्या पत्रकार बांधवांना आपल्या आरोग्या विषयी चिंता किंवा खबरदारी घ्यावी वाटते त्या सर्वांनी मंगळवार दि. 22 ऑक्टोबर रोजी सकाळी काहीही न खाता पिता (उपाशी पोटी )आपल्या रक्ताचे नमुने व 800 रु फिस डॉ राजेश इंगोले यांचे समाधान मानसोपचार रुग्णालय या ठिकाणी जमा करावी. या सर्वांचे रक्ताचे नमुने तपासणी साठी मुबंई येथे पाठवण्यात येणार असून रविवार दि. 27 ऑक्टोबर रोजी आलेल्या ब्लड च्या रिपोर्ट नुसार तज्ञ डॉ दीपक कटारे (हृदयरोग तज्ञ), डॉ नागोराव डेरनासे (मधुमेहतज्ञ), डॉ प्रज्ञा किनगावकर (नेत्ररोगतज्ञ), डॉ जिगिशा मुळे (त्वचा रोग तज्ञ), डॉ संदीप जोगदंड (मेडिसीन) आदी डॉक्टर बांधव रिपोर्ट नुसार पत्रकारांची प्रत्यक्ष तपासणीकरून औषधोपचार व आहाराविषयीआपणास मार्गदर्शन करतील हे आरोग्य तपासणी शिबीर सर्व पत्रकार बांधवा साठी खुले असल्याने अधिकाधिक पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांनी या आरोग्य तपासणी शिबिरात सहभागी व्हावे असे आवाहनडॉ राजेश इंगोले (वैद्यकीय कक्ष प्रमुख )दत्तात्रय अंबेकर (हल्ला विरोधी कृती समिती जिल्हा निमंत्रक), प्रशांत लाटकर (तालुका अध्यक्ष) अभिजीत लोमटे (डिजीटल मीडिया अध्यक्ष) यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com